**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग – दोन**

**सोमवार, दिनांक २० ऑक्टोबर, २०२५ / आश्विन २८, १९४७ (शके)**

**१२१. लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण :-**

विधानसभेचे सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन सोमवार, दिनांक ३ मार्च, २०२५ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन बुधवार, दिनांक २६ मार्च, २०२५ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात एकूण २९३ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २६ मार्च, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. २९३ निवेदनांपैकी २५ निवेदने मा. सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आलेली होती व एकूण २६८ निवेदनांपैकी ९४ निवेदने गुरुवार, दिनांक १२ जून २०२५ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ६४ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली. तसेच १७४ निवेदनांपैकी ४५ निवेदने गुरुवार, दिनांक ११ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या पत्रक भाग – २ क्रमांक ११५ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. आता १२९ निवेदनांपैकी १६ निवेदने निवेदने कक्षात प्राप्त झाली असून ती या सोबत वितरीत करण्यात येत आहेत. उर्वरित प्रलंबित ११३ निवेदनांचा संबंधित मंत्रालयीन विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

तसेच एम.के.सी.एल. तर्फे विकसित करण्यात आलेल्या MOIS या संगणकीय प्रणालीद्वारे सन्मा. विधानसभा सदस्यांनी संपूर्णत: ऑनलाईन (Online) पध्दतीने लक्षवेधी सूचना दिलेल्या असल्यामुळे विधानसभा सदस्यांना ऑनलाईन (Online) पध्दतीने निवेदने प्राप्त होणार असून उर्वरित प्रलंबित निवेदने प्राप्त झाल्यानंतर सर्व विधानसभा सदस्यांना पत्रक भाग -२ द्वारे अवगत करण्यात येईल.

**विधान भवन,**
**मुंबई**
**दिनांक : २० ऑक्टोबर, २०२५**

**मेघना तळेकर**
**सचिव-२,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य
२) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
३) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) सचिव- १, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
५) सचिव- २, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
६) सचिव- ३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
७) सचिव- ४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष
९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
१०) संगणक कक्ष (WEBSITE)
११) एम.के.सी.एल.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्रमांक १२०९

श्री. सुनिल प्रभू, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१२०९ पुढीलप्रमाणे आहे:-

"मुंबईतील मालाड (पूर्व) दिंडोशी विधासभा क्षेत्रातील आप्पा पाडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व मल्टिस्पेशालिटी ओपीडी करिता नविन यंत्र सामुग्री बसविण्यासाठी व आरोग्य ओपीडी आरोग्य केंद्र दवाखान्यात एचबीटी पॉलीक्लिनीक अंतर्गत नेत्ररोग व कान,नाक, घसा तज्ञ यासाठी आवश्यक यंत्रसामुग्री पुरवठा करण्याचे पालिका प्रशासनाने आश्वासन देऊनही अद्याप यावावत कोणतीच कार्यवाही न करणे, यामुळे रुग्णांची मुलभूत सुविधांसाठी झालेली गैरसोय, येथील अस्वच्छ व दुर्गंधीयुक्त संचालय, सुरक्षा रक्षक नसणे, शुद्ध पिण्याचे पाणी नसणे, औषधांचा वेळेवर पुरवठा न होणे, रुग्णांच्या सोयीसाठी डॉक्टरांच्या वेळा वाढविण्याबाबत दुर्लक्ष होणे, आदि महत्वाच्या समस्या सोडविणेबाबत लोकप्रतिनिधींनी पालकमंत्री, महापालिका आयुक्त यांना दि.२७.०१.२०२५ रोजी लेखी निवेदन देऊनही अद्याप यावर कोणतीच कार्यवाही न होणे, यामुळे येथील नागरिकांची आरोग्य सोईसुविधा अभावी झालेली व होत असलेली प्रचंड गैरसोय, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

मा.उपमुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मालाड (पूर्व) दिंडोशी येथील आप्पापाडा पॉलीक्लिनिक मध्ये नेत्ररोग तपासणीची आवश्यक यंत्रसामग्री पुरवण्यात आली असून नेत्ररोग तज्ञांच्या सेवा (दर सोमवारी) पोलिक्लिनिक मध्ये देण्यात येतात. याबरोवर दररोज दंतशल्य चिकित्सक, आठवड्यातील तीन दिवस सोमवार, बुधवार व शुक्रवार बालरोग तज्ञ, दर बुधवारी त्वचारोग तज्ञ, दर गुरुवारी अस्थिरोग तज्ञ व फिजीशियन अशा विविध तज्ञांच्या सेवा पुरवण्यात येत आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर पॉलीक्लिनिक मध्ये कान, नाक, घसा यासाठी लागणारी आवश्यक यंत्रसामुग्री पुरविण्याची कार्यवाही सुरु असून सदर सेवा सुरु करण्यात येत आहे. या बरोवरच आप्पापाडा येथे 'आपला दवाखाना' दररोज दुपारी ३.०० ते रात्री १०.०० या वेळेत कार्यरत असून तेथे डॉक्टर उपलब्ध आहेत.

अप्पापाडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व मल्टीस्पेशालिटी ओपीडी येथे स्वच्छता राखण्याकरिता कंत्राटी तत्वावर नियुक्ती केलेले कर्मचारी व रुग्णालयातील कर्मचाऱ्यांमार्फत स्वच्छता राखली जाते. तसेच, येथे २४ तास सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी औषधांचा मुबलक साठा उपलब्ध असून गरजेप्रमाणे औषधे वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत पुरविले जात आहेत. आप्पापाडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व मल्टीस्पेशालिटी ओपीडी येथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असून एक्वागार्ड बसविण्यात आले आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या लेखी निवेदनाच्या अनुषंगाने कार्यकारी आरोग्य अधिकारी यांनी सदर ठिकाणी प्रत्यक्षात भेट देऊन सदर कामकाजाचा आढावा घेतला व सेवा सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधीतांना दिले आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत आप्पापाडा दवाखाना येथे सन २०२१ पासून ओपीडी आणि क्युरेटिव्ह सेवा सकाळी ९.०० ते दुपारी ४.०० या वेळेत सुरु असुन आजपर्यंत एकूण ८०२३३ रुग्ण तपासणी करण्यात आली आहे. तसेच, आप्पापाडा येथे बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना ऑक्टोबर, २०२२ पासून ओपीडी आणि क्युरेटिव्ह सेवा दुपारी ३.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत सुरु असून येथे ७१६५७ रुग्ण तपासणी करण्यात आली आहे. तसेच, आप्पापाडा नागरी आरोग्य केंद्र येथे दंत चिकित्सा-२४३७ रुग्ण तपासणी, फिजीशियन-८०७ रुग्ण तपासणी, त्वचा रोग-१४९७ रुग्ण तपासणी, नेत्र चिकित्सा-१०७५ रुग्ण तपासणी, अस्थी व संधी रुग्ण-४१४ रुग्ण तपासणी, सोनोग्राफी सेवा व रक्त तपासणी-१२५० अशा तपासण्या करण्यात आलेल्या आहेत.

***

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्रमांक २०५६

श्रीमती सुलभा गायकवाड, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२०५६ पुढीलप्रमाणे आहे:-

"शासन निर्णय दि. १३/५/२०२२ नुसार अनेक मनपा शाळांना राज्य आदर्श शाळा प्रकल्पात निवड झालेली असणे. राज्यातील शाळांबरोबरच उल्हासनगर मनपा शाळा पुनर्बांधणी साठी एकूण रुपये १,९८,५०,०००/- मंजूर केलेले असणे. दिनांक २२/८/२०२२ रोजी एकूण निधी पैकी रुपये ४८,५५,१४४/- मनपा कडे वर्ग केलेले असणे. दि. ३१/१/२०२४ रोजी एकूण निधी पैकी दुसरा टप्पा रुपये ६९,४७,५०० जमा असणे, तरीही शाळा बांधकामाला सुरुवात झालेली नसणे, दिलेल्या अनुदानाचा वापर अन्य खर्चासाठी केलेला असणे, आयुक्तांची परवानगी वा अधिकार प्रत्यायोजन नसताना लेखाधिकारी यांनी मनपा व शासन निधीचा खर्च केल्याचे निदर्शनास येणे, जिल्ह्यात इतर शाळेला उल्हासनगर सोबतच अनुदान मिळालेले असणे व सदरच्या शाळेचा बांधकाम पूर्ण झाले असणे, हेतुपुरस्सर उल्हासनगर मनपा शाळेचे काम प्रलंबित ठेवणे, निधीच्या सद्यःस्थिती बाबत कोणतीही माहिती नसणे, निधीचा अपव्यय करणाऱ्या लेखाधिकारी यांचेवर कठोर कारवाई करण्याच्या अनुषंगाने तात्काळ करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

## मा.उपमुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई (समग्र शिक्षा) यांचेमार्फत "राज्य आदर्श शाळा" प्रकल्पात उल्हासनगर महानगरपालिकेची शाळा क्रमांक २५ ही आदर्श शाळा म्हणून विकसित करण्याकरीता शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत दिनांक ०५ मार्च, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये निवड करण्यात आलेली आहे.

सदर शाळेच्या पुनर्बांधणीकरीता रु.१,९८,५०,०००/- इतक्या रक्कमेस मंजूरी दिली असून, रु.४८,५५,१४४/-(३०%) इतका निधी शालेय शिक्षण विभागाकडून दि.२२ ऑगस्ट, २०२२ रोजी उल्हासनगर महानगरपालिकेस वितरित करण्यात आला. तद्नंतर उर्वरित रु.६९,४७,५००/- इतका निधी मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षण विभाग प्राथमिक, जिल्हा परिषद, ठाणे यांच्यामार्फत दि. ३१ जानेवारी, २०२४ रोजी उल्हासनगर महानगरपालिकेस वितरित करण्यात आला.

उल्हासनगर महानगरपालिका शाळा क्र.२५ चे विकास काम सुरु करण्यापुर्वी शाळेची जागा महानगरपालिकेच्या नावे असणे गरजेचे असल्याकारणाने, उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाकडे सनद/मालकी हक्क प्राप्त करणेकरीता प्रस्तावित करण्यात आले.

त्यानुषंगाने, व्यवस्थापकीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांच्यामार्फत दि.२३ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या आदेशान्वये उल्हासनगर महानगरपालिकेस या जागेची सनद/मालकी हक्क प्राप्त झाले आहे.

तद्नंतर उल्हासनगर महानगरपालिकेच्या नगररचना विभागास शाळेच्या बांधकाम परवानगी करीता दिनांक २२ नोव्हेंबर, २०२३ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर प्रस्तावास उल्हासनगर महानगरपालिकेच्या नगररचना विभागाची दिनांक ०४ मार्च, २०२५ रोजी मान्यता प्राप्त झाली असून, त्या अनुषंगाने सदर कामाबाबत प्रशासकीय व वित्तीय मान्यतेची कार्यवाही सुरु आहे. मान्यतेनंतर विहीत ई-निविदा पध्दतीने सदरच्या निधीचा विनियोग करण्यात येणार आहे.

***

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्रमांक २२४२

**श्री.नरेंद्र भोंडेकर, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२२४२ पुढीलप्रमाणे आहे:-**

"मुंबई महानगरपालिकेतील भ्रष्ट स्थापत विभागाचे कार्यकारी अधिकारी प्रकाश बिर्जे हे के/ई वार्ड बृहमुंबई महानगरपालिका येथे एकाच पदावर एकाच ठिकाणी १० वर्षापासून कार्यरत असतांना भ्रष्टमार्गाचा व पदाचा दुरऊपयोग करून मोठया प्रमाणात गैरप्रकार करून सुध्दा त्याची प्रतिनियुक्तीवर मलाईदार असलेल्या एसआरएमध्ये करण्यात येणे,या अधिकाऱ्याच्या विरोधात एसीबीने केलेल्या प्राथमिक चौकशीमध्ये मोठया प्रमाणात अपसंपदा आढळून आल्याने एसीबीच्या अधिकाऱ्यांनी मनपा आयुक्त यांना तीन वेळा पत्रव्यवहार करून बिर्जेच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची परवानगी मागणे,मात्र आयुक्तांनकडून अघापही परवाणगी देण्यात आलेली नसणे,वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आर्शिवादाने बिर्जे हा भ्रष्ट अधिकारी अजुनही मलाईदार पदावर बसून मोठया प्रमाणात गैरप्रकार करीत असणे, मनपाचे सहायक अभियंता असलेले भ्रष्ट अधिकारी धनंजय सुर्यवंशी हा एसआरएमध्ये प्रतिनियुक्तीवर असतांना सुध्दा लाचलुचपत अधिकाऱ्यांनी लाच घेतांना रंगेहात पकडणे,याही अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्याची आयुक्ताकडे परवानगी मागून सुध्दा अघापही देण्यात आलेली नसणे,मुंबई पालिकेतील २१भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या चौकशीसाठी एसीबीने मुंबई मनपाचे आयुक्ताकडे परवानगी मागून सुध्दा अघापही परवाणगी देण्यात आलेली नसणे,या भ्रष्ट अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्ती मलाईदार असलेल्या एसआरए विभागात करून त्यांना पुन्हा गैरप्रकार करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून प्रस्तोसहाण मिळणे,या गंभीर प्रकरणी संबधितावर कडक कारवाई होणे आवश्यक असतांना सुध्दा याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे नागरिकात पसरत असलेले तीव्र असंतोष, परिणामी यागंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

**मा.उपमुख्यमंत्री महोदयांचे निवेदन**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागात सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या पदावर श्री.प्रकाश शंकर बिर्जे, उप प्रमुख अभियंता (स्थापत्य) हे दि.२९.०५.२०१३ ते दि.२४.११.२०१६ असे ३.५ वर्ष व कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर दि.०२.०३.२०२२ ते दि.२२.१०.२०२३ असे १ वर्ष ८ महिने या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेत कार्यरत होते.

गृहनिर्माण विभागाच्या दि.२०.१०.२०२३ रोजीच्या आदेशान्वये श्री. प्रकाश शंकर बिर्जे यांची प्रतिनियुक्तीने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण येथे कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर प्रथमत: २ वर्षासाठी नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर श्री.बिर्जे यांची दि.१५.०२.२०२४ रोजी उपप्रमुख अभियंता या पदावर पदोन्नती झाल्याने गृहनिर्माण विभागाच्या दि.१६.०७.२०२४ रोजीच्या आदेशान्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई येथे उप प्रमुख अभियंता (स्थापत्य) या पदावर

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांच्या दि.०३.०६.२०२४ च्या पत्रान्वये, श्री.बिर्जे, कार्यकारी अभियंता, के/पूर्व विभाग यांच्या मालमत्तेची उघड चौकशी करण्याची परवानगी देण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेस कळविण्यात आले. त्यानुसार आयुक्त, महानगरपालिका यांनी दि.१७.०३.२०२५ अन्वये लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांना परवानगी दिली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अभियांत्रीकी संवर्गातील श्री.धनंजय सुर्यवंशी, सहाय्यक अभियंता (स्थापत्य) यांची गृहनिर्माण विभागाच्या दि.२३.१०.२०१७ च्या आदेशान्वये सहाय्यक अभियंता (स्थापत्य), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली.

श्री.धनंजय सुर्यवंशी, सहाय्यक अभियंता हे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण येथे प्रतिनियुक्तीवर कार्यरत असताना त्यांच्याविरुध्द लाचेच्या मागणीच्या प्रकरणी गुन्हा क्र.१९/२०१९ दाखल करण्यात आला. श्री.सुर्यवंशी, सहाय्यक अभियंता यांचेविरुध्द दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई अथवा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेस अवगत करण्यात आले नव्हते.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांच्याकडून अभियोगपूर्व मंजूरीचे प्रकरण बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर करण्यात आले, त्यावेळी सदर प्रकरणाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेस अवगत झाले. त्याअनुषंगाने, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार श्री.सुर्यवंशी, सहाय्यक अभियंता (स्थापत्य) यांच्या विरुध्द दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याबाबत महानगरपालिका आयुक्त यांनी दि.१८.११.२०२४ अन्वये त्यांना अकार्यकारी पदावर नियुक्ती करण्याचे आदेश दिल्याने श्री.सुर्यवंशी, सहाय्यक अभियंता (स्थापत्य) यांची अकार्यकारी पदावर नेमणूक करण्यात आली.

श्री.सुर्यवंशी हे सहाय्यक अभियंता म्हणून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण येथे कार्यरत असताना लाचेच्या मागणीचे प्रकरण घडले असल्याने त्यांच्या प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अभियोग मंजुरी द्यावी किंवा कसे याबाबतच्या अभिप्रायासाठी प्रकरण महानगरपालिकेमार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना वर्ग करण्यात आले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द लाचलुचपत प्रकरणांत लाचलुचपत्त प्रतिबंधक विभाग, मुंबई यांच्याकडून गुन्हा दाखल २१ प्रकरणांपैकी ५ प्रकरणांत अभियोगपूर्व मंजूरी देण्यात आली असून उर्वरित १६ प्रकरणांत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित सक्षम प्राधिकारी यांच्याकडून अभियोगपूर्व मंजूरी देण्याची कार्यवाही सुरु आहे.

***

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्रमांक २३५५

श्री. वरुण सरदेसाई, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२३५५ पुढीलप्रमाणे आहे:-

"बृहन्मुंबई महानगरपालिकेने ८ जुलै २०२५ पासून बेकरी आणि रेस्टॉरंट ना कोळशावर चालणाऱ्या तंदूर भट्ट्या कायमस्वरुपी बंद करून हरित ऊर्जेवर व्यवसाय चालू ठेवण्याची अट टाकलेली असणे, सदर निर्देशांमुळे लहान व्यावसायिकांवर मोठ्या प्रमाणात आर्थिक ताण येण्याची शक्यता निर्माण होणे, तसेच या व्यवसायिकांच्या उत्पादनावरच याचा परिणाम होण्याची शक्यता निर्माण होणे, शासनाने लादलेल्या या निर्बंधांमुळे तंदूर भट्टीवर काम करणाऱ्या अनेक तरुणांचे रोजगार शासन हिराऊन घेत असल्याने या कामगारांबाबत शासनाने विचार करण्याची आवश्यकता, शासनाने अशा प्रकाराचे निर्देश लागू करून व्यवसायिकांची गळचेपी करून या बदल्यात महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडून हप्ते वसुलीस प्रोत्साहन मिळणे, तंदूर रोटी, तंदूर खाद्यपदार्थ हे भारतीय खाद्यसंस्कृतीतील महत्वाचा घटक असल्याने सदर निर्बंध मागे घेऊन पुन्हा या व्यवसायिकाना तसेच या तंदूर भट्टीवर उदरनिर्वाह करणाऱ्या कामगाराना दिलासा देण्याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

---

मा.उपमुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३९४ मधील तरतूदीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत बेकरी धारकांना अनुज्ञापन देण्यात येते. त्यानुसार महानगरपालिकेच्या हद्दीत एकूण १०६४ बेकऱ्या असून त्यापैकी ३२९ बेकऱ्यांमध्ये लाकूड व कोळसा यांचा वापर करण्यात येत आहे.

वाहनांचे उत्सर्जन, बांधकामाच्या ठिकाणी निर्माण होणारी धूळ, कारखाने, कचरा जाळणे इ. कारणांमुळे मुंबईमध्ये वायु प्रदुषणामध्ये वाढ होत असून आय.आय.टी. मुंबई व निरी यांनी सन २०१९ साली केलेल्या अभ्यासानुसार बेकरी, तंदूर भट्ट्या सुध्दा ३.५% PM २.५ हवेच्या प्रदुषणास कारणीभूत असल्याचे निर्दशनास आले.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या निर्देशानुसार प्रथम कोळसा व लाकूड इंधन म्हणून वापरणाऱ्या बेकरी धारकांना गॅस अथवा वीज रुपांतरणासाठी एका वर्षाच्या कालावधीची नोटीस बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत माहे डिसेंबर, २०२४ मध्ये देण्यात आल्या. तथापि, बेकरी

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.९ जानेवारी २०२५ रोजीच्या आदेशान्वये, बेकरी व तत्सम उद्योगांनी लाकूड किंवा कोळसा इंधन म्हणून वापरण्याचे पुढील सहा महिन्यांमध्ये थांबवून हरित इंधनाचा वापर करावा, असे निर्देश दिलेले आहेत.

तसेच, संबंधित महानगरपालिकेने नविन परवाने देण्याआधी या बाबतची खातरजमा करावी. तसेच, यापुढे कोळसा आणि लाकडाचा वापर करण्यास परवानगी देणारे कोणतेही नवीन परवाने, मान्यता आणि बेकरी किंवा तत्सम व्यवसाय उघडण्यासाठी परवानगी दिली जाणार नाही. तसेच, अशा युनिट्सनी फक्त हरित इंधन, सीएनजी, गॅस इत्यादी वापरावेत. लाकूड आणि कोळसा वापर करु नये, असे निर्देश मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिले आहेत.

या आधारेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी दि.०७.०२.२०२५ च्या परिपत्रकान्वये, मुंबई महानगर प्रदेशामधील सर्व महानगरपालिकांना Air Prevention & Control of Pollution Act, १९८१ च्या कलम ३१A अनुसार, बेकरी, रेस्टॉरंट्स, भट्टी तत्सम उद्योग यामध्ये लाकूड व कोळसा यांचा वापर दि.०९ जुलै, २०२५ पूर्वी बंद करून हरित इंधनाचा वापर करणे बंधनकारक आहे, असे निर्देश दिले आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे मा.उच्च न्यायालय, मुंबई व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या उक्त आदेशानुसार, बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील बेकरी व तत्सम व्यावसायीकांनी लाकूड व कोळसा यांचा इंधन म्हणून वापर करणे दि.०८ जुलै २०२५ पर्यंत बंद करून हरित इंधन वापरण्याबाबत संबंधित व्यावसायिकांना आदेश दिले आहेत. त्यानुसार याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे संबंधित व्यवसायिकांना आवश्यक ते तांत्रिक सहाय्य व मदत करण्यात येत आहे.

***

लक्षवेधी सूचना क्रमांक १५५७

सन २०२५ चे पहिले (अर्थकंल्पीय) अधिवेश

श्री. रमेश बोरनारे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १५५७ पुढीलप्रमाणे आहे:-

" मौजे खंडाळा, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणात गौण खनिज पट्टा असणे, गौण खनिज उत्खनन करताना दिलेल्या परवान्यापेक्षा जास्त उत्खनन करून गौण खनिज काढणे, परिणामतः शासनाचा महसुल बुडवून शासनाची फसवणूक करणे, परिसरातील गावातील नागरिकांना प्रदूषणाला सामोरे जाऊन नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे, खदानीचे उत्खनन फार मोठ्या प्रमाणात झालेले असणे, उत्खननामुळे खदानीची खोली प्रमाणापेक्षा जास्त झालेली असणे, खदान उत्खननासाठी वापरण्यात येणारी ब्लास्टिंग साठीची जिलेटीन मधील स्फोटक साहित्य खोल खदानीत तसेच जमा होऊन राहणे, पावसाळ्यात खदानीत पाणी भरून त्यात जिलेटीनमधील जमा झालेली दारू मिसळून परिसरातील विहिरीमध्ये क्षारयुक्त पाणी उतरून पाणी दूषित होणे, त्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे. याबाबत स्थानिक रहिवाश्यांच्या अनेक तक्रारी असणे, खदानीतून निघणाऱ्या दगडाची व खडी वाहतूक करणारी वाहन ओव्हर लोड वाहतूक करत असणे, ओव्हरलोड वाहतुकीमुळे रस्ते खराब होणे, परिणामतः नागरिकांना दळणवळणाच्या अडचणी निर्माण होणे. त्यामुळे महसूल बुडवून शासनाची फसवणूक व भ्रष्टाचार झाल्याचे लक्षात आणून देऊनही स्थानिक प्रशासनाने कोणतीही कार्यवाही न करणे, अधिकारी व क्रशर मालक यांच्यामध्ये साटेलोटे असल्याबाबत जनमाणसात पसरलेला तीव्र असंतोष आणि नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजे खंडाळा, ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर मध्ये आज रोजी एकूण १४ खाणपट्टे आहेत. सदर खाणपट्टे हे विविध विभागांचे ना हरकत दाखले व पर्यावरण अनुमती याबाबी प्राप्त असल्याचे विचारात घेवून सक्षम प्राधिकारी यांनी महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील तरतुदीनुसार खाणपट्टे मंजूर करण्यात आलेले आहेत.

प्रत्येक खाणपट्टयासाठी स्वतंत्र खाणकाम आराखडा NABET मान्यता प्राप्त पर्यावरण सल्लागारामार्फत तयार करण्यात येवून त्यास संचालक, भुविज्ञान व खनिकर्म संचालनालय कार्यालयाची मान्यता देण्यात येते. त्यामध्ये खाणकाम आराखड्यामध्ये खदानीची एकूण उत्पादन क्षमता नमुद करण्यात आलेली असते. मौजे खंडाळा, ता. वैजापूर येथील सर्व

खाणपट्टयामध्ये खाणपट्टाधारकाकडून खाणकाम आराखड्यानुसार उत्खनन करण्यात येत आहे.

खाणपट्टाधारकांकडून स्वामित्वधनाची रक्कम चलनाव्दारे शासन खाती जमा करण्यात येते. त्यामुळे शासनास महसूल प्राप्त होत असतो. मौजे खंडाळा, ता.वैजापूर येथील १४ खाणपट्टाधारक यांच्या सदर खाणपट्टयाची सन २०२३-२०२४ या वर्षात ईटीएस मोजणी करण्यात आल्यानंतर ईटीएस मोजणी अहवालानुसार ताळमेळ घेण्यात येवून सन २०२३-२०२४ वर्षाकरीता रू.०२,७०,७५,९१४/- एवढ्या रकमेचे स्वामित्वधन शासन जमा करण्यात आले आहेत. सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता आज अखेर रू. ०२,८९,२१,२२०/- एवढे स्वामित्वधन शासन जमा केले असून, २०२४-२०२५ या वर्षाचा ईटीएस मोजणी करण्यासाठी उपअधिक्षक, भुमी अभिलेख, वैजापूर व उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वैजापूर यांना कळविलेले आहे. गौण खनिज उत्खनन करताना खाणपट्टाधारकाकडून नियमितपणे स्वामित्वधनाची रक्कम चलनाव्दारे शासन खाती जमा केली जात असलयाने शासन महसूल बुडालेला नाही किंवा शासनाची फसवणूक झालेली नाही. सदर खाणपट्टयातून गौण खनिज उत्खनन करताना दिलेल्या परवान्यापेक्षा जास्त उत्खनन करून गौण खनिज काढण्यात आल्याची बाब आढळून आलेली नाही.

वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, शिवुर यांच्या अहवालानुसार मौजे खंडाळा, ता.वैजापूर येथील सार्वजनिक पिण्याचे पाण्याचे स्त्रोत यांचे माहे जून २०२४ ते सप्टेंबर २०२४ कालावधीत पाणी नमुने तापासणी केली असता, सदर पाणी पिण्यास योग्य असल्याचे दिसून आले आहे. गौण खनिज उत्खननामुळे झालेल्या खदानी मध्ये पाणी साठवून क्षारयुक्त पाण्यामुळे भुजल प्रदुषित होत असल्याबाबत तक्रार अथवा अहवाल प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झालेला नाही.

तसेच मौजे खंडाळा, ता. वैजापूर येथील दिनांक २४.०२.२०२५ रोजी दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने दिनांक २६.०२.२०२५ व २८.०२.२०२५ रोजी सांडस वस्ती, ठोंबरे विहिर, जाधव विहिर येथील पाच विहिर व १ बोर यांचे जैविक व रासायनिक पाणी नमुने पाणी तपासणी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले असता, ३ पिण्यास योग्य व ३ पिण्यास अयोग्य असल्याचे प्रयोगशाळेच्या अहवालात आढळून आले आहे. याबाबत प्रादेशिक आरोग्य प्रयोगशाळा, छत्रपती संभाजीनगर येथे पाठविण्यात आलेले सदरील स्त्रोतांचे पाणी नमुने तपासणी अहवाल अप्राप्त आहे.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्या अहवालानुसार छत्रपती संभाजीनगर जिल्हयात दिनांक ०१.०४.२०२४ ते २८.०२.२०२५ या कालावधीत एकूण २३४ वाहनांची तपासणी केली असता, दोषी आढळून आलेल्या ५१ दोषी वाहनावर कारवाई करण्यात येवून रू. १२,२६,५००/- एवढी दंडात्मक रक्कम वसूल केली आहे.

**********************************************

लक्षवेधी सूचना क्र.२२०६

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

~~सर्वश्री~~. राजेश वानखडे ,मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"अमरावती जिल्ह्यातील मौजा (जामठी) कुन्हा ता. तिवसा येथील शिवारात मुन्ना सिद्धकी नामक इसमाचे विना परवानगी अवैध मुरूम व गिट्टी खदान सुरू असणे, स्थानिक नागरिकांनी येथे मोठ्या प्रमाणात अवैध मुरूम व गिट्टीचे उत्खननाकरिता विनापरवानगी बालस्टिंग करण्यात येत असून त्यामुळे परिसरातील नागरिकांच्या घराला तडे जाणे, त्याचप्रमाणे विहिरी, बोअरवेल चे भूजल सुद्धा घटले असल्याबाबत स्थानिक प्रशासनाकडे सातत्याने तक्रारी केलेल्या असणे,त्यावर अद्यापही प्रशासनाने कारवाई केलेली नसणे, तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त अमरावती यांना मी स्वतः दि.२४/०२/२०२५ रोजी पत्राद्वारे कारवाई करण्याची मागणी करणे, परंतु अद्यापही चौकशी व कारवाई प्रलंबित असणे, राहत्या घरांना तडे गेल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण, नागरिकांमध्ये निर्माण होणारा रोष, यावर शासनाची प्रतिक्रिया व शासनाने करावयाची कारवाई."

---

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ अन्वये जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या दिनांक ३१.०८.२०२१ च्या आदेशान्वये खाणपटटाधारक यांना मौजा जामठी, ता. तिवसा, जि. अमरावती येथील गट क्र. ३७/१, मध्ये पाच वर्षाच्या कालावधीकरीता दगड या गौण खनिजपट्टा मंजुर करण्यात आलेला आहे. खाणपट्टाधारक यांनी ब्लास्टिंग करण्याबाबत संचालक, खान सुरक्षा महानिर्देशानालय, नागपुर यांच्याकडुन दिनांक १६.०७.२०२४ अन्वये नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त केले आहे. तसेच संचालक, खान सुरक्षा महानिर्देशानालय संचालक नागपूर यांचे दिनांक ०८.११.२०२४ च्या पत्रान्वये खाण व्यवस्थापक म्हणून श्री.आर.सुधाकर यांना नियुक्त करण्यास मान्यता दिलेली आहे.

तहसिलदार, तिवसा यांनी दिनांक १५.०३.२०२५ रोजी केलेल्या स्थळपाहणीमध्ये मौजा घोटा,ता.तिवसा जि.अमरावती येथील गजानन इंदोरे, रघुनाथ मुंडे, रघुनाथ थोटे, जगदिशराव मुंडे, चंदाबाई जांभुळे, निलेश बहाये यांची घराची पाहणी केली असता, त्यांच्या घरांना तडे पडल्याचे दिसून आले. पंरतु, सदर घराचे अंतर ब्लास्टिंगच्या ठिकाणापासुन अंदाजे १००० ते १३०० मीटर आहे. तसेच, या गावातील विहीरींची पाहणीत विहीरींमध्ये मुबलक पाणीसाठी असल्याचे दिसुन आलेले आहे.

लोकप्रतिनिधी यांनी २४.०२.२०२५ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने विना परवाना खदान सुरु असल्याबाबत, विनापरवानगी ब्लास्टिंग होत असल्याबाबत, विहीर व बोअरवेल यांचे नुकसान होत असल्याबाबत, नागरिकांचे घरांना तडे जात असल्याबाबत चौकशी होणेबाबत जिल्हाधिकारी,अमरावती यांना दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने अपर जिल्हादंडाधिकारी, अमरावती, उपविभागीय अधिकारी, तिवसा-भातकुली, जिल्हा खनिकर्म अधिकारी, अमरावती, वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्व्हेक्षण विकास यंत्रणा, अमरावती, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र

प्रदुषण नियंत्रण मंडळ, अमरावती व तहसिलदार तिवसा यांची संयुक्त समिती गठित करण्यात आलेली आहे. सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर नियमोचित कार्यवाही करण्यात येईल.

***************

लक्षवेधी सुचना क्र.७३४

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा. श्रीमती सुलभा गायकवाड, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ७३४ पुढीलप्रमाणे आहेः-

"कल्याण पूर्वेत चिंचपाडा १०० फुट रोड सर्व्हे क्रमांक १४४ तसेच नांदिवली तलावाजवळ कोयला डेपो आर टी ओ ऑफिसजवळ २२/११ केव्ही उपकेंद्र प्रस्तावित असणे, सदरहू उपकेंद्र हे कल्याण पूर्व विभागाअंतर्गत येणा-या सर्व ग्राहकांना अखंडित व दर्जेदार वीज पुरवठा करण्यासाठी आवश्यक असणे, तसेच याकरिता ३००० चौ.मीटर जागेची असलेली आवश्यकता, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केलेला पत्रव्यवहार, याकरिता केंद्र सरकारद्वारे वीज यंत्रणा सक्षम करण्यासाठी व वीज गळती कमी करण्यासाठी आरडीएसएस योजनेअंतर्गत देण्यात येणारा निधी उपलब्ध करुन घेण्याकरिता राज्य शासनाने केंद्र सरकारकडे शिफारस करण्याची आवश्यकता, सदर उपकेंद्र उभारणीकरिता तीन हजार चौ.मीटर जागा विज वितरण कंपनीला उक्त ठिकाणी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### मा. मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

कल्याण परिमंडळातील कल्याण मंडळ १ अंतर्गत कल्याण डोंबिवली महानगरपालिका या हद्दीत कल्याण शहर, डोंबिवली शहर तसेच एमएमआरडीए क्षेत्रातील कल्याण पूर्वेकडील १२ गावे समाविष्ट आहेत. कल्याण १ मंडळात कल्याण (पूर्व), कल्याण (पश्चिम) व डोंबिवली विभाग असे तीन विभाग कार्यरत आहेत. कल्याण मंडळ १ मध्ये घरगुती, व्यवसायीक, लघु औद्योगिक व इतर मिळून एकूण ७,६०,०१४ लघुदाब तसेच २९९ उच्चदाब वीज ग्राहक आहेत. सदर ग्राहकांना वीज पुरवठा करण्याकरिता २२/२२ केव्ही चे २४ स्वीचींग स्टेशन, ९०९.४६ किमी लांबीचे उच्चदाब वीजवाहीनीचे जाळे उभारण्यात आले आहे. त्यापैकी ४०६.४१ किमीची वीजवाहीनी भूमिगत (Underground) आहे. ५०३.०५ किमी उपरी तारमार्ग (Overhead) आहे. तसेच एकूण १२३३,०८ किमी लांबीचे लघुदाब वीज वाहीनीचे जाळे आहे. त्यापैकी ५९८.३२ किमी वीजवाहीनी भूमीगत (Underground) आहे व ७१२.७६ किमी उपरी तारमार्ग (Overhead) आहे.

तसेच, RDSS (वितरण प्रणाली सक्षमीकरण आधुनिकीकरण) योजनेतील प्रथम टप्पा म्हणून वितरण प्रणाली सक्षमीकरण व आधुनिकीकरण (RDSS) हानी कमी करण्याची योजना मंजूर असून, सदर योजनेअंतर्गत कल्याण मंडळाकरिता एकूण रुपये ६५.१५ कोटी रकमेचा निधी मंजूर झाला आहे. सदर वीज वितरण हानी कमी करण्याच्या योजने अंतर्गत ४२४ किमी ची एबी केबल (Aerial Bunch Conductor) व १८४ किमी उच्च दाब वाहिनी बळकटीकरण यांची कामे मंजूर झाली आहेत. त्यापैकी १९० किमी च्या एबी केबल (Aerial Bunch Conductor) व ६१ किमी उच्चदाब वाहिनी बळकटीकरण करणे याची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. यामुळे कल्याण पूर्व भागातील वीज वितरण हानी कमी करण्याचे उद्दिष्ट साध्य होण्यास मदत होणार आहे.

कल्याण पूर्व विभागातील वीज ग्राहकांना अखंडित, योग्य दावाचा व दर्जेदार वीज पुरवठा करण्यासाठी वितरण प्रणाली सक्षमीकरण व आधुनिकीकरण (RDSS) या योजनेअंतर्गत कल्याण मंडळ-१ याअंतर्गत असलेल्या तीनही विभागीय कार्यालय यांच्या कार्यक्षेत्रात नवीन रोहित्र उभारणे, नवीन उच्च दाब व लघु दाब वाहिनी याचे बळकटीकरण तसेच आवश्यक असलेल्या वाहिनीच्या तारा बदलणे, आवश्यक तेथे उपरी तारमार्ग वाहिनीचे भूमिगतीकरण करणे, तसेच सदर भागात नवीन वेगवेगळे वीज उपकेंद्र उभारणे प्रस्तावित केले आहे. ज्यामुळे वीज ग्राहकांना अखंडित व योग्य दावाने

वीज पुरवठा देणे शक्य होईल. ग्राहकांना अखंडीत व योग्य दाबाने वीज पुरवठा करण्याकरीता कल्याण मंडळ-१ कार्यक्षेत्रांत वितरण प्रणाली सक्षमीकरण व आधुनिकीकरण (RDSS) योजनेअंतर्गत, शासनाच्या ताब्यातील उपलब्ध असलेल्या मोकळ्या भूखंडावर नव्याने २२/११ के.व्ही. उपकेंद्र प्रस्तावित करण्यात आले आहे. सदर योजनेमध्ये कल्याण पूर्व भागात एकूण ८ उपकेंद्र प्रस्तावित करण्यात आली आहेत. त्या अनुषंगाने चिंचपाडा व लगतच्या भागात मोकळ्या भूखंडांची तपासणी करून उपकेंद्राची जागा निश्चित करण्यात आली आहे. सध्या सदर परिसरात २२/२२ केव्ही लोकधारा स्विचिंग स्टेशन व नेतिवली स्विचिंग स्टेशन वरून वीज पुरवठा केला जातो. सदर योजने अंतर्गत प्रस्तावित चिंचपाडा उपकेंद्राचे काम पूर्ण झाल्यानंतर सदर दोन्ही स्विचिंग स्टेशनचा वीज जोड भार या प्रस्तावित उपकेंद्रामुळे विभागला जाऊन वीज वितरण हानी कमी होईल. तसेच ग्राहकांना अखंडित व दर्जेदार स्वरूपाचा वीज पुरवठा देण्यास मदत होईल.

चिंचपाडा येथे नवीन २२/११ केव्ही आऊटडोअर उपकेंद्र प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यासाठी कंपनीच्या प्रचलित नियमाप्रमाणे २८०० स्कवेअर मीटर जागेची आवश्यकता असते, सद्य:स्थितीत त्याभागातील वीजेची मागणी १५ एमव्हीए असून भविष्यातील प्रतिवर्षि ५% वीजेची वाढती मागणी लक्षात घेता चिचपाडा येथे नवीन २२/११ के उपकेंद्र व सोबत त्याच भूखंडावर २०० स्कवेअर मीटर जागेवर नवीन शाखा कार्यालय सुद्धा प्रस्तावित करण्यात आले आहे. अशी एकूण ३००० स्कवेअर मीटर जागेची आवश्यकता असल्यामुळे सदर जागा उपलब्ध करुन देण्याबाबत आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे.

वितरण प्रणाली सक्षमीकरण व आधुनिकीकरण (RDSS) योजनेच्या सुरुवातीच्या सर्वेक्षणा दरम्यान नांदिवली तलावाजवळ कोयला डेपो आर टी ओ ऑफिस येथे उपकेंद्रासाठी नियोजित केलेली जागा ही तांत्रिकदृष्ट्या अव्यवहार्य असल्याकारणाने अंतिम स्वरूप देतांना सदर जागेवर उपकेंद्र प्रस्तावित करण्यात आले नाही. त्याऐवजी कल्याण पूर्व भागाकरिता एकूण प्रस्तावित केलेल्या इतर नवीन ८ उपकेंद्रापैकी ३ नवीन (२२/२२ के. व्ही. रुस्तमजी, साकेत ओपेस्टर व चिंचपाडा) उपकेंद्राद्वारे नांदिवली व कोयला डेपो भागातील सध्याचा व भविष्यातील येणाऱ्या विद्युतभाराची मागणी पूर्ण करता येणे शक्य होणार आहे. त्यामुळे सदर परिसरातील प्रस्तावित ८ उपकेंद्र कार्यान्वित झाल्यानंतर नांदिवली येथे नवीन उपकेंद्र उभारण्याची आवश्यकता असणार नाही.

*****************************************************************************

लक्षवेधी सुचना क्र. २५२८

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. चरणसिंग ठाकूर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.२५२८ पुढीलप्रमाणे:-

"काटोल नरखेड विधानसभा क्षेत्रात दि. ५ मार्च २०२३ पासून महावितरण अंतर्गत सगळ्या प्रकारची कामे RDSS मधील कामे पॉलीकॅब कंपनी यांना वर्क ऑर्डर होऊन २ वर्ष पूर्ण झाली असणे, परंतु आज पर्यंत या अंतर्गत येणारी फिडर सेपरेशशन LT LINE, ११KV LINE चे कामे न झाल्यामुळे नागरिकांना LOW VOLTAGE चा सामना करावा लागणे, शेतकऱ्यांना AG कृषी पंपाचा वीज पुरवठा वारंवार खंडित होणे, परिणामी शेतींच्याया कामात अडचणी निर्माण होणे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिडेची भावना निर्माण होणे, पॉलीकॅब कंपनीच्या कंत्राटदाराकडून वीज पुरवठ्यासारख्या संवेदनशील बाबीत होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष व या गलथान कारभाराची चौकशी करून कारवाई करण्याची आवशक्यता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

### मा.मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

नागपूर जिल्हयातील RDSS-वाहिनी विलगीकरण योजनेअंतर्गत नवीन ११ केव्ही उच्च दाब उपरी /भूमिगत वाहिनी, नवीन वितरण रोहित्रे, एस.डी.टी., लघु दाब उपरी वाहिनी आणि फीडर बे असे एकूण रु ३५६.८१ कोटी इतक्या रकमेचे कार्यादेश मे. पॉलीकॅब इंडिया लिमीटेड, मुंबई यांना देण्यात आले आहे. त्यापैकी काटोल आणि नरखेड विधानसभा क्षेत्रासाठी RDSS-वाहिनी विलगीकरण योजनेअंतर्गत एकूण रु ११०.३० कोटी इतक्या रकमेची तरतुद आहे.

काटोल आणि नरखेड या क्षेत्रात एकूण ७७ वाहिनी पैकी १३ वाहिन्यांचे काम दि.१७.०६.२०२५ रोजी पर्यंत पूर्ण झाले असून, उर्वरित ४१ वाहिनी विलगीकरणाची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच RDSS - वीज हानी कमी करणे (Loss Reduction) या योजनेअंतर्गत ११/३३ केव्ही उच्च दाब उपरी वाहिनी, नवीन वितरण रोहित्रे, लघु दाब ए बी केबल एकूण रु.२२३.७२ कोटी इतक्या रकमेचे कार्यादेश मे. पॉलीकॅब इंडिया लिमीटेड, मुंबई यांना देण्यात आले आहेत. त्यापैकी, काटोल आणि नरखेड या क्षेत्रातील कामासाठी RDSS वीज हानी कमी करणे (Loss Reduction) योजनेअंतर्गत एकूण रु.१६.२९ कोटी इतक्या रकमेची तरतुद आहे.

काटोल आणि नरखेड या क्षेत्रात दि.१७.०६.२०२५ पर्यंत एलटी एबी केबल प्रस्तावित ९२ कि.मी. पैकी ३६.८० किमी एबी केबलचे काम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच प्रस्तावित ३२ नवीन वितरण रोहीत्रे (HVDS) पैकी १३ रोहीत्राची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.

कंत्राटदाराच्या संथ प्रगतीमुळे निविदेच्या अटी व शर्तीनुसार मे. पॉलीकॅब इंडिया कंपनी लिमिटेड, मुंबई या कंपनीला महावितरण कंपनीकडून दि २०.११.२०२३, २०.०२.२०२४ व १८.०३.२०२५ नुसार कामाच्या प्रगतीचा वेग वाढविण्याकरिता नोटीस टू करेक्ट (Notice to Correct) देण्यात आलेल्या आहेत. कंत्राटदार मे. पॉलीकॅब इंडिया कंपनी लिमिटेड यांच्याकडे कामाच्या प्रगतीचा वेग वाढविण्यासाठी पाठपुरावा करून उपरोक्त कामे प्राधान्याने पुर्ण करण्यात

येतील व वाहिनी विलगीकरणाची कामे पूर्ण झाल्यानंतर उपरोक्त वाहिन्यावरील अकृषी ग्राहकांना २४ तास थ्रीफेज वीज पुरवठा उपलब्ध होईल.

काटोल नरखेड या क्षेत्रातील वीज ग्राहकांना एकूण १११ वीज वाहिन्यांव्दारे वीज पुरवठा करण्यात येतो. सद्यस्थितीत काटोल नरखेड विधानसभा क्षेत्रातील ग्राहकांना योग्यदाबाने वीज पुरवठा करण्यात येत आहे व वीज ग्राहकांच्या Low Voltage बाबतच्या तक्रारी महावितरण कंपनीच्या क्षेत्रीय कार्यालयास प्राप्त झालेल्या नाहीत. कृषीपंप ग्राहकांना कंपनीचे नियमाप्रमाणे ८ तास थ्री फेज वीज पुरवठा चक्राकार पध्दतीने करण्यात येत आहे. काही आकस्मिक कारण जसे की वादळ वारा, तांत्रिक बिघाडामुळे वीज पुरवठा खंडीत झाल्यास नादुरूस्त उपकरणांची दुरूस्ती / बदली करून सदर वीज पुरवठा महावितरण कडून प्राधान्याने सुरळीत / पूर्ववत करण्यात येतो. कृषीपंप ग्राहकांना योग्यदाबाने वीज पुरवठा करण्यात येत आहे.

**********

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन लक्षवेधी सूचना क्र. ३७

श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"३३-११ या योजनेच्या अंतर्गत मुंबई शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर पीटीसीची निर्मिती होत असताना पीटीसी धोरणानुसार फक्त भाडेतत्त्वावर देण्याची योजना असल्यामुळे या सदनिका प्रकल्पग्रस्तांना देता येत नसल्याचे निदर्शनास येणे, त्यामध्ये, आजमितीला मुंबई शहरात विकास प्रकल्प बाधित लोकांची संख्या एक लाखापेक्षा जास्त असणे, त्यामुळे पीटीसीचे प्रकल्पग्रस्त सदनिकांच्या मध्ये परिवर्तन करण्यासंदर्भात शासन निर्णय करण्यात आला असणे, परंतु अद्यापपावेतो त्याची अंमलबजावणी करण्यात आली नसणे, त्यामुळे पीटीसीचे प्रकल्पग्रस्त सदनिकांच्या मध्ये परिवर्तन करण्याची कार्यवाही करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

---

मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ विनियम ३३ (११) अन्वये कायमस्वरुपी संक्रमण शिबीरे (PTC) बांधण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. सदर विनियमातंर्गत बांधण्यात आलेल्या सदनिका संक्रमण शिबीर म्हणून शिवशाही पुनर्वसन प्रकल्पास हस्तांतरीत करण्यात येतात. शिवशाही पुनर्वसन प्रकल्पामार्फत सदर पीटीसी सदनिका ह्या खाजगी विकासक तसेच, शासकीय प्राधिकरणे यांना भाडेतत्वावर दिली जातात.

मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ८९७३/२०२३ मध्ये प्रकल्पग्रस्तांसाठी सदनिका वाटपाचे धोरण शासनस्तरावर निश्चित करण्याबाबत आदेश दिलेले आहेत. त्यानुसार दि.१९.०८.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये, सार्वजनिक हिताच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या अंमलबजावणीमुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पबाधित व्यक्तींसाठी प्रकल्पबाधित सदनिका (PAP) निर्माण करुन वितरीत करण्याबाबतचे धोरण करण्यात आले आहे. या धोरणात (DCPR-२०३४) मधील विनियम ३३ (११) नुसार मिळणाऱ्या एकूण चटईक्षेत्र निर्देशांकांपैकी ५० टक्के पीटीसी सदनिका ह्या पीएपी सदनिका म्हणून परिवर्तीत करण्याबाबतची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पीएपी सदनिका उपलब्ध होऊ शकतील. या तरतूदीनुसार पुढील कार्यवाही करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार झोपु प्राधिकरण, बृहन्मुंबई यांनी विनियिम ३३ (११) अन्वये भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येणाऱ्या योजनांमध्ये ५०% पीटीसी सदनिका प्रकल्पग्रस्तांसाठी पीएपी सदनिकांमध्ये परावर्तीत करण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार आतापर्यंत सुमारे २११ पीटीसी सदनिका प्रकल्पग्रस्तांसाठी पीएपी सदनिकांमध्ये परावर्तीत करण्यात आल्या आहेत.

******************

महाराष्ट्र विधानसभा

नगर विकास विभाग

सूचना क्र. ७३५

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्रीमती सुलभा गायकवाड, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ७३५ पुढीलप्रमाणे आहे:-

"कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस पाणी पुरवठा करणा-या बारवी धरण, बारवी नदी ,उल्हास नगरी प्रदुषणाच्या विळख्यात सापडणे, उक्त नदयांमार्फत महानगर पालिकेच्या पाणी जल शुध्दीकरण प्रकल्पापर्यत वाहत येणा-या पाण्यामध्ये मोठया प्रमाणात सांडपाणी तसेच अनेक आजुबाजुच्या कंपन्यामधून सोडण्यात येणारे रसायन मिश्रीत सांडपाणी मिसळत असल्याचे निदर्शनास आणण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक १५/२/२०२५ रोजी केलेला पत्रव्यवहार, सदर नदयाच्या पाण्यात मृत जनाव-यांचे शव टाकण्यात असल्याने पाणी दुषित होणे, शहरातील नागरिकांना दुषित पाणी प्यावे लागणे, परिणामी अनेक आजारांना सामोरे जावे लागणे, तसेच पिण्यासाठी येत असलेल्या पाण्याला देखील दुर्गंधी येणे, नागरिकांना गढूळ व दुषित पाणी येत असल्याबाबत वांरवार महानगर पालिकेकडे तक्रारी करुनही प्रशासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी नागरिकामध्ये प्रशासनाप्रती निर्माण झालेली चिडेची व असंतोषाची भावना, तसेच शासनाच्या अहवालानुसार बाष्पीभवन व वाहनव्ययद्वारे पाणी वाया जात असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून बारवी धरणातून कल्याण-डोंबिवली शहराला मोठया पाईपलाईन मार्फत थेट पाणी पुरवठा करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

उल्हासनदी खोऱ्यातील पाणी पुरवठयाचे नियोजन व नियंत्रण पाटबंधारे विभागामार्फत करण्यात येते. कल्याण डोंबिवली महानगरपालिका उल्हासनदीतून ३६५ द.ल.लि. प्रतिदिन पाणी उचलते. तसेच, महानगरपालिकेच्या मोहिली, बारावे व नेतिवली येथील जलशुध्दीकरण केंद्रात शुध्दीकरण प्रकिया करून कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात नागरिकांना शुध्द पाणी वितरीत केले जाते. महानगरपालिका क्षेत्रात सन २०१५ साली समाविष्ट झालेल्या २७ गावांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जांभूळ येथील जलशुध्दीकरण केंद्रातून उपलब्ध पाणी महानगरपालिकेमार्फत वितरीत केले जाते. त्यामुळे नागरिकांना दूषित पाणी पुरवठा होत असल्याचा व पाण्याला दुर्गंधी येत असल्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच, कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये पाण्यामुळे कुठल्याही साथरोगांच्या तक्रारी नागरिकांकडून महानगरपालिकेकडे प्राप्त झालेल्या नाहीत.

महानगरपालिका क्षेत्रात पुरविल्या जाणाऱ्या पाण्याची गुणवत्ता जलशुध्दीकरण केंद्रातील प्रयोगशाळा तसेच कोकण भवन येथील शासकीय प्रयोगशाळेमार्फत वेळोवेळी तपासली जाते. नागरिकांनी केलेल्या गढूळ व दूषित पाण्याबाबतच्या तक्रारींची तातडीने दखल घेऊन महानगरपालिकेमार्फत प्रतिबंधात्मक व निर्मूलनात्मक कार्यवाही करण्यात येते. सद्यस्थितीत महानगरपालिकेतील लोकसंख्येचा विचार करता पाणीकोटा वाढविणेबाबत जलसंपदा विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तसेच, अमृत २.० योजनेअंतर्गत नविन ९५ द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेचे गौरीपाडा येथे जलशुध्दीकरण केंद्र तसेच, मोहिली येथे २७५ द.ल.लि. क्षमतेचे उदंचन केंद्र बांधणेचे काम प्रगतीपथावर आहे.

**********

## महाराष्ट्र विधानसभा

**नगर विकास विभाग** **सूचना क्र. १७५७**

**सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

**श्री. नरेंद्र मेहता, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहेः-**

"ठाणे जिल्ह्यातील मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त श्री. ढोले यांच्या कार्याकाळात अनेक अनियमित व नियमबाह्य कामे झाल्याचे वारंवार निदर्शनास आले असणे, नवीन इमारत बांधकाम परवानग्या देतांना नियमांचे उल्लंघन करणे, रूग्णालय आरक्षीत भुखंड नियमबाह्य पध्दतीने विकासकाला देणे, पालिकेच्या राखीव निधीच्या मुदत ठेवी नियमबाह्य पध्दतीने मोडून त्या पैश्यातून ठेकेदारांचे देयक अदा करून भ्रष्टाचार करणे, नाट्यगृह उभारणेकरीता विकासकाला नियमबाह्य पध्दतीने TDR देणे, धुळ नियंत्रक वाहने व अग्निशमन विभागात नियमबाह्य बुलेट खरेदी, शौचालयाच्यां निवीदेत भ्रष्टाचार, नियमबाह्य पध्दतीने देयेके अदा करणे, प्रारूप विकास आराखडा मंजूर नसतांनाही शैक्षणिक भुखंड आयुक्तांच्या मर्जीतल्या खाजगी संस्थांना देण्याकरिता निविदा प्रसिध्द करणे, महापालिकेचे मुख्यालयाचे इमारतीचे भुमीपुजन मा. मुख्यमंत्र्यांनी हस्ते होऊनही त्या कामाचा पाठपुरावा न करता दुसऱ्या ठिकाणी विकासकाला फायदा पोहोचविण्याचा दृष्टीकोणातून नियमबाह्य पध्दतीने दुसऱ्या ठिकाणी पालिका मुख्याल्याचे भुमीपुजन करणे, नियमबाह्य पध्दतीने होर्डीगची निवीदा प्रसिध्द करून पालिकेचे करोडो रूपयांचा नुकसान करणे, परिवहन सेवेच्या बसेसचे नियमबाह्य पध्दतीने मर्जीतील ठेकेदारांना ठेका देऊन भ्रष्टाचार करणे, या व अशा अनेक भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये आयुक्तांनी अनियमितता केली असून याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची आवश्यकता, तसेच श्री. ढोले यांच्यावर गुन्हा दाखल करून करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

**मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन**

एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) दि.०२.१२.२०२० रोजी पासून मंजूर केली असून, त्यानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नवीन इमारतींना बांधकाम परवानगी किंवा पुर्नविकास परवानगी देणेकामी वास्तुविशारद / सल्लागार अभियंता यांच्यामार्फत प्राप्त झालेल्या प्रस्तावांचो तांत्रिक छाननी करून, नियमानुसार विकास परवानगी देण्याची कार्यवाही करण्यात येते. महानगरपालिकेकडे मौजे भाईंदर सर्व्हे क्रमांक २५५(६६६)/२पै., ३ पै., व २५४(६६९)/१ या जागेत महानगरपालिकेने दिलेल्या सुधारित बांधकाम परवानगीच्या संदर्भात आर. जी. चे क्षेत्र पूर्व मंजूरीनुसार कमी केल्याबाबतची तक्रार महानगरपालिकेस प्राप्त आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने महानगरपालिकेने विकासक व सोसायटी सभासद यांची संयुक्त सुनावणी घेऊन दिलेल्या सुधारित बांधकाम परवानगीस स्थगिती दिलेली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार विकास योजना मधील आरक्षित भुखंड हे विकास योजना अंमलात आल्याच्या अंतिम दिनांकापासुन पुढील १० वर्षात जमिनीचे भूसंपादन किंवा विकास हक्क प्रमाणपत्र किंवा खाजगी तडजोडीद्वारा महानगरपालिकेने जमिन हस्तांतरीत करुन घेतल्यास आरक्षण हे व्यपगत होणार नाही, ही बाब विचारात घेऊन सदर प्रकरणात UDCPR नियमावलीमधील समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून "हॉस्पीटल" या प्रयोजनासाठी महानगरपालिकेने आरक्षण विकसित करणेबाबतची कार्यवाही केली आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेस अर्थसंकल्पीय जमा तरतूदींच्या अनुषंगाने प्रत्यक्ष प्राप्त होणारा महसूल हा अत्यंत कमी प्राप्त झाल्या कारणाने व कोरोनामुळे निर्माण झालेले अतिरिक्त दायित्व यामुळे महानगरपालिकेवर आर्थिक टंचाई निर्माण झाल्याने कंत्राटदार निविदा भरत नसल्याने, विकास कामांवर झालेला खर्च तसेच, कंत्राटदाराची देयके, STEM WATER ची प्रलंबित देयके, कार्यरत तसेच, निवृत्त अधिकारी / कर्मचारी यांचा ७ वा वेतन आयोगाचा हप्ता व दैनंदिन देयके याकरीता तात्पुरती व्यवस्था व प्रशासकीय भाग म्हणून प्रशासकीय ठराव पारीत करून, प्रतिपूर्तीच्या अधीन अग्निशमन दलाचा रू.३० कोटी निधी आवश्यक बाबींवर खर्च करण्यात आला आहे, ही वस्तुस्थिती आहे.

महानगरपालिका हद्दीत मध्यवर्ती ठिकाणी एकमेव असलेल्या अद्ययावत अशा नाटयगृहाचे कन्स्ट्रक्शन टीडीआरच्या मोबदल्यात झालेल्या उभारणीमुळे महानगरपालिकेची सुमारे रु.१२०.०० कोटी रुपयांची आर्थिक बचत होऊन सदरचे नाट्यगृह हे अंतर्गत सजावटीसह टीडीआरच्या कन्स्ट्रक्शन मोबदल्यात महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे.

महानगरपालिका पर्यावरण विभागामार्फत धुळ नियंत्रणासाठी दोन धुळ नियंत्रक वाहने खरेदी केली असून, सदर वाहने ई-निविदा प्रणालीव्दारे खरेदी केलेली आहेत. सदर वाहनांची खरेदी ही ५ वर्ष निगा देखभालीसह असल्याने, ५ वर्ष महानगरपालिकेला देखभाल दुरुस्तीचा कोणताही खर्च करावा लागणार नाही. सद्यस्थितीत दोनही वाहने कार्यरत आहेत.

महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकरीता बुलेट वाहने खरेदी करण्याच्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया राबविली असून, तीन कंत्राटदारांपैकी लघुत्तम दर सादर करणाऱ्या निविदाधारकाची निविदा स्विकारण्याची निविदा समितीने केलेल्या शिफारशीनुसार प्रशासकीय ठराव पारीत करून, निविदा स्विकृती केली आहे. अग्निशमन विभागाच्या बुलेट वाहने खरेदीकरणेकरीता विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करून निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. शौचालयाच्या निविदेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी, अंदाज पत्रकास तांत्रिक मान्यता, निविदा सूचना, निविदा समितीची मान्यता व अंतिम निविदेस सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेण्यात आलेली आहे. निविदा प्रक्रिया करताना व कार्यादेश देताना सर्व विहीत पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. तसेच, देयके मंजूर दरानुसार अदा करण्यात आलेली आहेत.

मौजे भाईंदर येथील स.क्र.४७८पै. व इतर या जमिनीवरील बांधकाम परवानगीस दि.२३.१२.२०१५ पासून असलेली स्थगिती, शहराची वाढती लोकसंख्या व त्याअनुषंगाने द्याव्या लागणाऱ्या वाढीव सुविधा व वाढीव लागणारे मनुष्यबळ याकरीता महानगरपालिकेची अस्तित्वातील इमारत ही भविष्यामध्ये अपुरी पडण्याची शक्यता विचारात घेऊन, महानगरपालिकेच्या ताब्यातील नागरी सुविधांचे भूखंडावर महानगरपालिकेने "महानगरपालिका भवन" उभारण्याचे नियोजन केले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत BOT तत्वावर १ वर्ष उभारण्याचा कालावधी + ९ वर्ष कालावधीत होर्डिंग, ॲडपोल व बॅकलिट ॲड बोर्ड या जाहिरात माध्यमांकरीता रक्कम रु.५१,११,६०,६६५/- इतकी मुल्याधिकारीक रक्कम निश्चित करुन निविदा काढण्याकामी आर्थिक व प्रशासकिय मंजुरी घेऊन निविदा मागविण्यांत आली. प्राप्त झालेल्या निविदांकरीता निविदा समितीची मान्यता व अंतिम निर्विदेस सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेण्यात येऊन, मे. सोल्युशन ॲडव्हटायजिंग यांचे सोबत करारनामा करुन कार्यादेश देण्यांत आला. मे. सोल्युशन ॲडव्हटायजिंग यांचे कडून महानगरपालिकेस होर्डिंग, ॲडपोल व बॅकलिट ॲड बोर्ड यासाठी एकूण ९ वर्षांकरीता रक्कम रु.५१,७६,००,०००/- इतका जाहिरात महसुल प्राप्त होणार आहे. सदरचा महसुल हा मुल्याधिकारीक रक्कमेपेक्षा रक्कम रु.६४,३९,३३५/- जास्तीचा आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाने GCC तत्वावर बसेस चालविणेकरीता विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करून निविदा प्रक्रिया राबविलेली आहे.

********

नगर विकास विभाग
लक्षवेधी सूचना क्र.२३१९

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. कृष्णा खोपडे व श्री.प्रविण दटके, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.२३१९ पुढीलप्रमाणे आहे :-**

"नागपूर शहरातील सार्वजनिक उपयोगाचे ३३५ भूखंड धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक कार्याकरिता अंदाजे ६० वर्षापूर्वी केलेले भूखंडाचे वाटप, ना.सु.प्र. द्वारे नवीनकुमार समिती / गिलानी समिती यांचे कारण सांगून व उच्च न्यायालयाचा आधार घेऊन लीज नवीनीकरण करण्यास होत असलेली टाळाटाळ नागपूर सुधार प्रन्यासने अनेक संस्था, खाजगी व्यक्तींना जागा लीजवर दिल्या असून त्यांनी जागेचा उपयोगच केला नसणे. नियमाप्रमाणे नकाशा मंजूर न करणे, त्यांना नोटीस न देणे व जागा आपल्या ताब्यात न घेणे, त्यामुळे नागपूर सुधार प्रन्यास द्वारे होत असलेला गैरव्यवहार ना.सु.प्र.ने निवासी/वाणिज्य वापराकरिता लिलावद्वारे प्लॉट विकले असून अनेकांनी कोविडच्या काळात नकाशा मंजुरीची मान्यता न घेणे, त्यावर नागपूर सुधार प्रन्यासने १०० टक्के पेनाल्टी लावणे, कुठल्या कायद्यांतर्गत ही कारवाई होत असणे, मौजा-तरोडी, खसरा क्रं. ८०/१ एकूण १३.५ एकर डंपिंग यार्ड प्रकल्पासाठी सन १९६४ साली संपादित करून जिल्हाधिकारी, नागपूर यांनी ना.सु.प्र.ला जागा देणे, आरक्षण ॲग्रीकल्चर शेतीकरिता असताना नागपूर सुधार प्रन्यासचा या जागेचा एकमेकाला जागा विकण्याचा गोरखधंदा, ना.सु.प्र. ने त्यांना एन.ओ.सी. देणे व त्यांनी निवासी करिता ले आउट टाकणे, १३.५ एकर ॲग्रीकल्चर शेती ५० कोटीचा सौदा करून विकणे व नागपूर सुधार प्रन्यास मध्ये तक्रार करून सुद्धा कारवाई होत नसून, त्याचे उत्तर सुद्धा देत नसणेयावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना"

---

मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास) महोदयांचे निवेदन

नागपूर सुधार प्रन्यासने सार्वजनिक / निमसार्वजनिक उपयोगाकरीता संस्थेस शैक्षणिक, वैद्यकीय, धार्मिक व सामाजिक या उद्देशाकरीता ३३५ भुखंडके वाटप करण्यात आली आहेत. भूखंडधारक वाणिज्य वापर करीत असल्याचे महालेखाकार यांनी आक्षेप नोंदविल्यामुळे श्री. अनिल वडपल्लीवार यांनी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे जनहित याचिका क्र. २२२७/२००४ सादर केली. या याचिकेच्या अनुषंगाने राज्य शासनाच्या अनुमोदनानुसार अतिरिक्त मुख्य सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली अंतर्गत चौकशी समिती (In-House Inquiry) दि.०२ जानेवारी, २००५ च्या आदेशान्वये गठित करण्यात आली. यानुसार राज्य शासनाने दि. ३०.०४.२००५ च्या अधिसूचनेद्वारे श्री नवीन कुमार, अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली गठीत एक सदस्यीय समितीने दि.३१.०८.२००५ रोजी आपला अहवाल शासनास सादर करुन दि.०५.०९.२००५ रोजी मा. न्यायालयासमोर सादर केला.

नविन कुमार समितीने ८५ भूखंडधारक संस्थांद्वारे सदर भूखंडांचा वाणिज्य वापर होत असल्याबाबत त्यांच्या अहवालात आक्षेप नोंदविले व सदर भूखंडावर नागपूर सुधार प्रन्यास जमीन विनियोग अधिनियम १९८३ व बांधकाम विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीनुसार आवश्यक कार्यवाही करण्याची शिफारस केली. या शिफारसीच्या अनुषंगाने नागपूर सुधार प्रन्यास जमीन

विनियोग अधिनियम १९८३, नियम २०(१४) अन्वये वाटपपत्रातील तरतुदींचा भंग केल्यामुळे नागपूर सुधार प्रन्यासद्वारे संबंधित संस्थांना दंड आकारून मागणीपत्र पाठविण्यात आले.

तथापि, नविन कुमार समितीच्या अहवालासंदर्भात न्यायालयीन मित्र (Amicus Curiae) श्री. अनंद परचूरे यांनी उपस्थित केलेल्या हरकतीच्या अनुषंगाने मा. न्यायालयाने मा. न्यायमुर्ती गिलानी यांची समिती गठीत केली. मा. न्यायमुर्ती गिलानी समितीने वाणीज्यिक उपयोगाबाबत आक्षेप नोंदवून शर्तभंग केलेल्या ११३ भुखंडांसंदर्भात मा. उच्च न्यायालयात अहवाल सादर केला. एकत्रित बांधकाम विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) २०२० मधील नियम ४.१० मधील तरतुदीप्रमाणे नुतनीकरणाकरीता बाधा नसलेल्या भूखंडधारकाचे भाडेपट्टा नुतनीकरण करण्यात येत आहे. अशा ११३ पैकी २ भुखंडाचे नुतनीकरण करण्यात आले आहे.

नागपूर सुधार प्रन्यासव्दारे सार्वजनिक / निमसार्वजनिक उपयोगाकरीता ३३५ संस्थांना भुखंडके लिज वर वाटप केलेली आहे. या सार्वजनिक भुखंडाचा उपयोग संस्थेनी १५ वर्षापर्यंत न केल्यास जमिन विनियोग १९८३ मधील (सुधारीत) नियम २०१५ मधील नियम २०(१२) प्रमाणे भुखंड वाटप रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येते. अशा १५ वर्षापर्यंत वापर न केलेल्या सार्वजनिक उपयोगाच्या २० भुखंडकांचे वाटप नागपूर सुधार प्रन्यासने नियम २०(१२) मधील तरतुदीप्रमाणे रद्द केले आहे.

भूखंडधारकाने नकाशा मंजूरीचा अर्ज सादर केल्यास एकत्रित बांधकाम विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) २०२० नुसार तपासणी करून मंजूरी देण्याबाबत कार्यवाही केली जाते. वाटपपत्रातील अटी व शर्तीचा भंग केल्यास नासुप्र जमिन विनियोग १९८३ मधील तरतुदीप्रमाणे संबंधित भूखंडधारकांना नोटीस देऊन आवश्यक कार्यवाही करण्यात येते.

नागपूर सुधार प्रन्यासद्वारे निवासी प्रयोजनाकरीता ५२१५८, वाणिज्य प्रयोजनाकरीता ४०३१ व औद्योगिक प्रयोजनाकरीता २१६४ भूखंडांचे वाटप केले असून नासुप्र जमिन विनियोग १९८३ चे नियम १७(२) मधील तरतुदीप्रमाणे विहित कालावधीमध्ये (३ वर्षात) बांधकाम न केल्यास पुढील एका वर्षाकरीता बाजारमूल्याच्या ५ टक्के दराने, दुसऱ्या वर्षाकरीता बाजारमूल्याच्या १० टक्के दराने व तिसऱ्या वर्षाकरीता बाजारमूल्याच्या २५ टक्के दराने वाढीव प्रव्याजीची आकारणी केली जाते. भूखंडधारकाने विहित कालावधीनंतर पुढील ३ वर्षानंतरही (एकूण ६ वर्षे) बांधकाम न केल्यास प्रति वर्ष ३० टक्के दराने अतिरिक्त प्रव्याजीची आकारणी केली जाते. त्यामुळे ज्या भूखंडधारकाने ९ वर्षानंतरही बांधकाम केले नसेल त्यास १०० टक्के प्रव्याजीची आकारणी करणे शक्य आहे.

मौजा तरोडी, खसरा क्र. ८०/१ आराजी १५.४६ एकर जमिनीचे भूसंपादन राजस्व प्र. क्र. ८७/ अ-६५/१९५६, ५७ अन्वये दिनांक ०८.१२.१९६१ रोजी भूसंपादन केले आहे. यातील १३.५ एकर शेतजमीनीचे श्री. नंदलाल ठाकुर व इतर यांना शेतीउपयोग नमूद करून दि. १७.०१.१९६९ रोजी वाटप करण्यात आले. दि. ०८.०४.१९६९ रोजी श्री. नंदलाल ठाकुर व इतर यांनी श्री. मोहनसिंग मंसारामजी ठाकुर यांना सदर जागेचे लिज होल्ड राईट्स हस्तांतरीत केले. दि. १४.०८.१९७० रोजी श्री.मोहनसिंग ठाकुर यांनी सदर जागेचे श्री. मोरेश्वर गजानन वजलवार यांना लिज होल्ड राईट्स हस्तांतरीत केले. सन १९९९ मध्ये भाडेपट्टा कालावधी संपुष्टात आल्यानंतर श्री. मोरेश्वर गजानन वजलवार यांना सन २०२९ पर्यंत भाडेपट्ट्याचे नुतनीकरण करून देण्यात आले. श्री. वजलवार यांनी दि. १३.०२.२००७ रोजी सदर जागेचे श्री. पोपटलाल पटेल यांना लिज होल्ड राईट्स हस्तांतरीत केले. सदर १३.५ एकर शेतजमीन श्री. पोपटलाल पटेल यांनी दि. २३.०६.२०२२ रोजी श्री. हर्ष अग्रवाल यांना रु. ६.४२ कोटी इतक्या रक्कमेस हस्तांतरीत केली. सदर लिज करून देण्यात आलेली जमिन वाटपत्रातील अटी व शर्तीनुसार वेळोवेळी हस्तांतरीत

करण्यात आल्याची नोंद नासुप्र अभिलेखात घेण्यात आली. श्री. हर्ष अग्रवाल यांनी शेतजमीनीचा रहिवासी वापर करण्याबाबत केलेल्या अर्जानुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ अन्वये सदर जागेचा निवासी (Residential Zone-4) वापर अनुज्ञेय असल्याने नागपूर सुधार प्रन्यास विश्वस्त मंडळाच्या दि. ०४.१०.२०२१ रोजी केलेल्या ठरावानुसार प्रचलित बाजारमूल्याच्या १५ टक्के अतिरिक्त प्रव्याजी रु. ७०.५१ लाख व २ टक्के भूभाटक रु. १.४२ लाख आकारून प्रयोजन बदलास मंजूरी दिली. सदर जागेवर अद्याप कोणताही निवासी अभिन्यास मंजूर झाल्याचे किंवा भूखंडाची विक्री झाल्याचे आढळून आले नाही. प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधी यांच्याशी सभापती, नागपूर सुधार प्रन्यास यांनी प्रत्यक्ष चर्चा करून दि. २६.०६.२०२४ रोजी अवगत केले आहे.

**********************

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

**श्री.भास्कर जाधव, वि.स.स.** यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना क्रमांक २०९४** पुढीलप्रमाणे आहे. :-

" गडचिरोली जिल्ह्यातील सर्व नवी आणि जुन्या खाणी त्वरित बंद करण्याच्या मागणीसाठी ७० गावांच्या ग्रामसभांनी निर्णायक संघर्ष पुकारला असल्याचे माहे मार्च २०२५ च्या पहिल्या सप्ताहात समोर येणे, सुरजागड परिसरातील दमकोंडी पाहाड येथे हजारो आदिवासी, वननिवासी आणि ग्रामसभा प्रतिनिधींनी एकत्र येत संविधानिक मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा केलेला निर्धार, त्यासाठी पर्यावरणप्रेमी नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी या लढ्यात सक्रीय भूमिका घेण्याचे आंदोलनकर्त्यांकडून करण्यात आलेले आवाहन, शासन आणि कंपन्यांच्या हस्तक्षेपाला थांबवण्यासाठी मोठ्या आंदोलनाची करण्यात आलेली तयारी, आमच्या पूर्वजांनी जपलेले हे जंगल आम्ही कधीही नष्ट होऊ देणार नाही. जंगल म्हणजे आमचा प्राण, आमचे जीवन, आमची संस्कृती आहे. कोणत्याही परिस्थितीत जल, जंगल, जमीन लुटू दिली जाणार नाही, असा ठाम इशारा ग्रामसभांनी दिलेला असणे, त्यामुळे सरकारने आणि कंपन्यांनी जर खाणकाम त्वरित बंद केले नाही, तर आंदोलन आणखी तीव्र करण्याचा ग्रामस्थांनी दिलेला इशारा, खाणींमधून निघालेली धूळ तसेच खाणीतील सांडपाणी डोंगरावरुन वाहत आल्यामुळे नदीचे, विहिरींचे पाणी दुषित झालेले असणे, त्यामुळे वाढलेली आजारपण, शेती नष्ट होण्याची भीती, असे असूनही खाणींवर कोणतीही कारवाई होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये असलेली तीव्र संतापाची आणि असंतोषाची भावना, त्यातून सुरु करण्यात आलेलेले आंदोलन, त्याची दखल घेऊन शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**श्री.शंभुराज देसाई, मंत्री (खनिकर्म) यांचे निवेदन**

मौजा सुरजागड, ता.एटापल्ली, जि.गडचिरोली येथील ३४८.०९ हे.आर. इतक्या लोह खनिजाच्या क्षेत्रासाठी, केंद्र शासनाने खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियमाच्या कलम ५ (१) नुसार दिनांक ३०/१२/१९९४ अन्वये दिलेल्या पूर्व मान्यतेच्या आधारे, भारतीय खाण ब्युरोने दिनांक ०३/०३/२००४ अन्वये मंजूर केलेल्या खाणकाम योजना मंजुरीच्या आधारे तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाने, दिनांक २९/०५/२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रदान केलेल्या पर्यावरण अनुमतीस अनुलक्षून राज्य शासनाने दिनांक १३/०४/२००७ रोजीच्या आदेशाद्वारे मे.लॉयड मेटल्स आणि इंजिनिअरिंग लि. या कंपनीस मायनिंग लिज मंजूर केली असून, या खाणपट्टयाची एकूण मुदत ५० वर्षे इतकी आहे.

पोलीस अधिक्षक, गडचिरोली याच्या अहवालानुसार दिनांक ०४/०३/२०२५ रोजी आजूबाजूच्या ७० गावातील आदिवासी हे दरवर्षी प्रमाणे निसर्ग पूजेसाठी गर्देवाडा येथे एकत्र जमा झालेली होती. सदर ठिकाणी आंदोलनाबाबत कोणतीही माहिती किंवा चर्चा झाल्याची माहिती किंवा निवेदन पोलीस विभागाकडे प्राप्त झालेले नाही. तसेच सुरजागड परिसरातील दमकोंडवाही पहाडी येथे शेकडो आदिवासी, ग्रामसभा व प्रतिनिधींनी एकत्र येत संविधानिक मार्गाने तीव्र आंदोलन करणार असल्याचे सध्यातरी कोणतीही चर्चा नाही अथवा अशी कोणतीही गोपनीय अथवा अन्य मार्गाने पोलीस विभागाकडे माहिती अथवा निवेदन प्राप्त झालेली नाही.

प्रदुषण मंडळाद्वारे दिनांक ०७/०१/२०२५ रोजी सुरजागड खाण उद्योगाच्या पहाणी दरम्यान, सदर उद्योग घटकाने मुख्य प्रवेशद्वारापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण केले असून, रस्त्यांच्या साफसफाईकरिता रोड स्विपींग मशीन पुरविणे, पाणी फवारणीकरिता फिरते पाण्याचे टँकर पुरविणे, अंतर्गत असलेल्या ३.०१ कि.मी. रस्त्यावर पाण्याचे फवारे बसविणे, मिस्ट कॅनन फॉगर्स बसविणे, पावसाचे पाणी अडविण्याकरिता ४ कि.मी. अंतराची संरक्षक भिंत बांधणे, पावसाचे पाणी स्थिर करुन सोडण्याकरिता ०७ सेटलींग टँक बांधणे, क्रशींग सेक्शनला ड्राय फॉग यंत्रणा बसविणे, हुड आणि कन्व्हेअर बेल्टला पत्र्याचे आच्छादन बसविणे, सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बसविणे, खाण परिसर, बांडे व हेड्री गाव येथे वातावरणीय हवा गुणवत्ता तपासणी यंत्रणा बसविणे, इ. कार्यवाही पूर्ण केलेली आहे.

## महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना

**मा. श्री. बाबाजी काळे वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २१३७ पुढीलप्रमाणे आहे:-**

"राज्य शासनाने दि.२५.२.२०२५ रोजी शासन निर्णय क्र. प्रवेश १२२५/प्र.क्र.१६/एसडी-२ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची व्याप्ती राज्यभर वाढविण्याबाबत व अधिक सुसूत्रता आणण्याबाबत काढण्यात येणे, या शासन निर्णयानुसार राज्यातील ग्रामीण भागातही इ. ११ वी केंद्रीय प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात येणार असणे, परंतु ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तालुक्यातील जवळच्या महाविद्यालयात प्रवेश न मिळाल्यास त्यांना महाविद्यालयात जाण्या-येण्याकरिता अडचणी निर्माण होणे, ग्रामीण भागातील महाविद्यालयांमध्ये असणारी प्रवेश क्षमता विचारात घेता काही महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी संख्येत घट होउन या विद्याशाखा बंद होण्याची शक्यता, सदर प्रवेश प्रक्रिया जवळपास दोन महिने सुरु असल्याने विद्यार्थ्यांचे दोन महिन्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, व्यावसायिक व कौशल्याभिमुख अभ्यासक्रमातील विद्यार्थी संख्येत घट होऊन सदर अभ्यासक्रम बंद पडू शकणे, सदर प्रवेश प्रक्रिया किचकट, सर्व्हर डाउन, लोडशेडिंग यासारख्या अडचणीमुळे विद्यार्थी व पालकांना मानसिक त्रास सहन करावा लागणे, यासह अनेक अडचणी निर्माण होणार असल्याने यासंदर्भात शासनाने पुनर्विचार करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

### मा. मंत्री, शालेय शिक्षण यांनी करावयाचे निवेदन

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापर्यंत इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक, अमरावती या पाच विभागातील फक्त महानगरपालिका क्षेत्रातील उच्च माध्यमिक विद्यालय / कनिष्ठ महाविद्यालयात राबविण्यात येत होती. या पाच महानगरपालिका क्षेत्रातील जवळपास १७०० कनिष्ठ महाविद्यालय आणि ४.५० लाख विद्यार्थी या प्रवेश प्रक्रियेत सहभागी होत होते. राज्य शासनाच्या "इज ऑफ लिविंग" या कार्यक्रमांतर्गत इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया संपूर्ण राज्यात राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याअनुषंगाने २५ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०२५-२६ पासून राज्यातील सर्व उच्च माध्यमिक विद्यालय / कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी चे प्रवेश केंद्रिय ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत आहेत.

सन २०२५-२६ पासून संपूर्ण राज्यात इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रकिया राबविण्यात येणार असल्याने यामध्ये ग्रामीण भाग सुध्दा समाविष्ट झाला आहे. जवळपास ९४३५ उच्च माध्यमिक विद्यालय / कनिष्ठ महाविद्यायांची २१२३७२० इतकी विद्यार्थी प्रवेश क्षमता आहे. त्याअनुषंगाने राज्यातील सर्व उच्च माध्यमिक विद्यालय / कनिष्ठ महाविद्यालय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत सहभागी झाल्यामुळे उच्च माध्यमिक विद्यालय / कनिष्ठ महाविद्यालयांचे जिल्हास्तर तसेच विभागस्तरावरील प्रशिक्षण, प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावरील आवश्यक बदल, नविन पर्याय समाविष्ट करावयाचे कामकाज सुरु होते.

तसेच न्यायालयीन प्रकरण, संकेतस्थळावर निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणी यामुळे थोडा अधिकचा अवधी लागलेला आहे. परंतू इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या कालमर्यादेचे महत्व लक्षात घेऊन संचालनालय स्तरावरुन कंपणीस वेळोवेळी संपर्क साधुन, बैठकांचे आयोजन करुन प्रवेशाशी संबंधीत विद्यार्थी व पालकांना जाणवणा-या तांत्रिक अडचणींचे समाधान करण्यात आले आहे. तसेच प्रवेशाचे अर्ज भरण्यासाठी पुरेसा कालावधी वाढवून देण्यात आला आहे. तसेच संचालनालय स्तरावरुन तात्काळ उपाययोजना व पर्यायी व्यवस्था उपलब्ध करुन त्रुटींची पुर्तता करण्यात आली आहे.

**ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यामागील मुख्य उद्देश पुढीलप्रमाणे आहेत:**

- ऑफलाईन प्रक्रियेमध्ये प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्याला प्रत्येक कॉलेजमध्ये प्रत्यक्ष जाऊन माहिती घ्यावी लागत होती. सद्यस्थितीत विद्यार्थ्यांना घरबसल्या राज्यातील/जिल्ह्यातील /तालुक्यातील सर्व उच्च माध्यमिकच्या शाखा दिसणार आहेत, व राज्यातील कुठल्याही उच्च माध्यमिक विद्यालय/कनिष्ठ महाविद्यालयाकरिता प्रवेशासाठी अर्ज करता येणार आहे.
- ऑफलाईन प्रक्रियेमध्ये प्रवेश घेण्यासाठी प्रत्येक कॉलेजमध्ये वेगळे फॉर्म फी व प्रवेश फी द्यावी लागत होती. परंतू इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेशामध्ये विद्यार्थ्यांना एकच वेळी फक्त १०० रुपये/- एवढे नोंदणी शुल्क आकारण्यात येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा श्रम व पैसा दोन्हीमध्ये बचत झाली आहे.
- इयत्ता ११ वी केंद्रिय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमुळे ११ वी च्या सर्व शाखेचे प्रवेश राज्यातील सर्व विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध झाले आहेत. ग्रामीण क्षेत्रातील विद्यार्थी त्यांच्या आवडीप्रमाणे शहरातील सर्व शाखांमध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश घेऊ शकतील.
- ऑफलाईन प्रक्रियेत विद्यार्थ्याला कनिष्ठ महाविद्यालयातील रिक्त जागा, शुल्क याची माहीती सहज उपलब्ध होत नव्हती, परंतू ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांना ही सर्व माहीती ११ वी ऑनलाईन प्रवेश पोर्टल वर उपलब्ध होणार आहे.
- ऑफलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये मदतीसाठी कोणतेही कॉल सेंटर आणि सपोर्ट ई-मेल सेवा उपलब्ध नव्हती. परंतु सद्यस्थितीत इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये येणा-या त्रुटीसाठी कॉल सेंटर व सपोर्ट ई-मेल सेवा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच ८ विभागस्तरावरील कार्यालयात टेक्नीकल सपोर्ट स्टाफ उपलब्ध करुन देण्यात आले आहे. आणि विभागीय स्तरावरील कर्मचा-यांचे दुरध्वनी क्रमांक पोर्टलवर देण्यात आले आहे.
- इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत एकही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही यासाठी शासन सतत प्रयत्नशील आहे व त्यानुषंगाने वेळोवेळी आवश्यक मार्गदर्शन करण्यात येत आहे. इयत्ता ११ वी चे सर्व प्रवेश हे ऑनलाईन पध्दतीने व गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येणार आहेत.

*************************

गृह विभाग / परि-२ | लक्षवेधी सूचना क्रमांक - १९७२

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. सुभाष देशमुख, मा. वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १९७२ पुढीलप्रमाणे आहे :-

"सोलापूर शहरा लगतच्या पुणे हैदराबाद रोड वरून दिवस रात्र दररोज हजारो जड वाहतूक सुरू आहे, त्यामध्ये सिमेंट वाहतूक करणारे बल्करची संख्या सुमारे ५५० च्या घरात असून शहरातून होटगी रोड विजापूर रोडवरील अशी वाहतूक सुरू सतत सुरू राहणे, यामुळे शहरात मोठ्या प्रमाणात अपघात होत असणे, पोलीस प्रशासनाकडून लगाम घातला तरी जीवघेणे बल्कर सुसाट सुरू असून हाकनाक बळी जात असणे, होडगी रोडवर आणि विजापूर रोडकडे जाणाऱ्या बल्कर वाहतुकीसाठी पर्याय नसल्याने अक्कलकोट रोड पाण्याच्या टाकी पासून ही वाहतूक होते, या अवजड वाहनांचा वेग नियंत्रणात राहावा यासाठी दोन ठिकाणी सिंगल, स्पीडब्रेकर निर्माण करण्यात आले आहेत असे पोलीस प्रशासनाचे म्हणणे आहे, शिवाय शहरातून जड वाहनांना सकाळी सात ते रात्रीनऊ पर्यंत येण्यास प्रतिबंध घातल्या घालण्यात आला आहे, तरी सुसाट वेगावर नियंत्रणासाठी चालकांची मानसिकता नसल्याचे दिसत असणे, ओव्हर लोड वाहतूक आणि रहदारीची वर्दळ पाहून बल्कर वाहतूक होणे अपेक्षित असणे, शहरालगत मार्गावरील वर्दळच्या ठिकाणी वेग नियंत्रणात अंकुश असला पाहिजे वाहतूक पोलीस नियंत्रण यंत्रणा दिसली की तेवढाच चाप बसतो पुन्हा आहे तीच स्थिती होत असणे त्यामुळे जीवघेणे अपघाताची मालिका किती दिवस चालणार असा सवाल शहरवासीयांमध्ये होत असणे, मार्केट यार्ड चौकातून हायवेवर तासाला किमान २५ सिमेंट बल्करची वाहतूक होत असल्याने प्रत्यक्षदर्शी दिसून येणे, गजबजलेल्या ठिकाणी अपघातावर नियंत्रणासाठी प्रभावी उपाययोजना करूनही या तोकड्या पडत असल्याचे चित्र, यामुळे पाहायला मिळत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा. मंत्री (परिवहन) महोदयांचे निवेदन

सोलापूर शहराच्या लगत फटातेवाडी, ता. दक्षिण सोलापूर येथे एन.टी.पी.सी. लि. ही कंपनी असून सदर कंपनीमधून फ्लाय ॲश (राख) ची वाहतूक बल्कर या वाहनातून होत असते. सदर कंपनीमध्ये ये-जा करण्याकरीता वाहन वाहतुकीचा मार्ग कुंभारी-सिध्देश्वर साखर कारखाना-होटगी-

फटातेवाडी-एनटीपीसी असा आहे. शहर वाहतूक शाखा सोलापूर यांनी एन.टी.पी.सी. लि. कंपनी, फटातेवाडी, ता. दक्षिण सोलापूर येथे जाणाऱ्या शहरातील इतर रस्त्यांवर सकाळी ०७ ते रात्री ०९ वाजेपर्यंत जड वाहतूकीकरीता प्रवेश बंदी केलेली आहेत. पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांनी दिनांक १०.०३.२०२३ रोजीच्या आदेशान्वये, महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ च्या अधिनियम, क्रमांक २२ चे कलम ३३ (१) (ब) नुसार, सोलापूर शहर हद्दीमध्ये सिमेंट वाहतूक करणाऱ्या बल्कर व सिमेंट वाहतूक करणारी इतर वाहने या प्रकारच्या वाहनांना सकाळी ०७ ते रात्री ०९ वाजेपर्यंत बंदी घातली आहे. जड वाहतुक बंदी काळात ज्या जड वाहतुक वाहनांना वाहतुक करायची आहे त्यांनी विहित नमुन्यात पोलीस आयुक्त कार्यालयास अर्ज केल्यानंतर त्यांना वाहतुकीच्या अनुषंगाने अटी व शर्ती घालून वाहतुक करण्यास परवानगी देण्यात येऊन सदर वाहनांवर पोलीसांकडून निगराणी ठेवण्यात येते. अक्कलकोट महामार्गावरुन पुणे व हैद्राबाद महामार्गाकडे जाण्यासाठी दुसरा पर्यायी मार्ग नसल्याने शहरातील नविन अक्कलकोट नाका, शांती चौक, जुना बोरामणी नाका, मार्केट यार्ड हा मार्ग जड वाहनांच्या वाहतुकीसाठी वेग मर्यादा देऊन २४ तास खुला ठेवण्यात आला आहे. सोलापूर शहरामध्ये येणारे राष्ट्रीय महामार्ग पुणे हैद्राबाद, सोलापूर-अक्कलकोट, सोलापूर तुळजापूर, सोलापूर-विजापूर, सोलापूर-रत्नागिरी या महामार्गावर अपघात होऊ नये म्हणून महामार्गावर आवश्यक असलेल्या सुधारणा करणेबाबत भारतीय राष्ट्रीय राज्य मार्ग प्राधिकरण यांना सूचित करण्यात आलेले आहे. अपघातांबाबत पोलीसांकडून नागरीकांमध्ये वारंवार जनजागृती करण्यात येत असते. शाळेतील विद्यार्थ्यांसह वगवेगळे उपक्रम राबवून जनतेमध्ये व शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाहतुक नियमाबाबत जनजागृती करण्यात येत आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर कार्यालय अंतर्गत असलेल्या ०६ वायुवेग पथकाकडुन सोलापूर जिल्ह्यामध्ये मोटार वाहन कायद्यान्वये दोषी वाहनांवर कारवाई करण्यात येते. प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर कार्यालयातंर्गत विशेष तपासणी मोहीमेमध्ये एन.टी.पी.सी. लि.कंपनी, फताटेवाडी, ता. दक्षिण सोलापूर येथून होणारे फ्लाय ॲश, पाउंड ॲश ओव्हरलोड वाहनांवर, माहे एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत एकूण ३५ दोषी वाहनांवर कारवाई केली असून एकूण रु. १५,३२,५००/- इतका दंड वसूल केलेला आहे.

**************

लक्षवेधी सूचना क्र.२३८८

## महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

डॉ.तुषार राठोड, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम क्र. १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२३८८ पुढीलप्रमाणे आहे:-

"मुखेड जि.नांदेड तालुक्यात अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील मान्यवर व्यक्तीचे स्मारक बांधणे, ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्ट्या महत्व असलेल्या स्थळांचा विकास करणे या योजनेतंर्गत नारायण काळबा गायकवाड रा.पेठवडज या व्यक्तीने नोंदणी रद्द झालेल्या स्वंयसेवी संस्थेच्या माध्यमातून ऐतिहासिक पार्श्वभूमी नसलेल्या तिन गावात महापुरुषाचे स्मारक बांधकामासाठी सुमारे ३०.०० कोटी रुपये. अटीशर्तीचे उल्लंघन करुन नियमबाह्य पध्दतीने योजनेवरील प्रत्यक्ष झालेल्या कामापेक्षा अधिकची रक्कम उचल केल्याचे माहीती समोर येणे, सद्यस्थितीत काम अर्धवट असणे, उपरोक्त व्यक्तीने अध्यक्ष व इतर पदाधिकारी म्हणून वेगवेगळ्या जातीधर्माचे बनावट प्रतिज्ञा पत्र, खोटे शपथ पत्र सादर करुन शासकीय अनुदानाचे अपहार करुन शासनाची फसवणूक केल्याचे दिसून येणे, उपरोक्त योजनेतंर्गत मंजूर कामात अनियमितता असणे, अल्पसंख्याक स्वंयसेवी संस्थेची मान्यता नसणे, अल्पसंख्याक विभाग योजनेचा लाभ घेणे, अशाप्रकारे शासन, अल्पसंख्याक विभाग व सामाजिक न्याय विभागाची अनाधिकृत रक्कमेची उचल केल्याचे दिसून येणे, अपहार असणे, खोटे कागदपत्रे तयार करुन शासनाची फसवणूक करण्याचा प्रकरणात दिवसेंदिवस होत असलेली वाढ उपरोक्त प्रकरणी दोषी असणा-या स्वंयसेवी संस्थेचे पदाधिकारी, संबंधित विभागाचे अधिकारी यांच्यावर कडक कारवाई होण्याची नितांत आवश्यकता असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने सखोल चौकशी करुन, शासन स्तरावर करावयाची कारवाई, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.संजय शिरसाट, मा. मंत्री (सामाजिक न्याय) यांचे निवेदन

सामाजिक न्याय विभागाच्या दि.०५.११.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील मान्यवर व्यक्तिंचे स्मारके बांधणे तसेच अनुसूचित जातीसाठी सांस्कृतिक व ऐतिहासिकदृष्ट्या महत्व असलेल्या स्थळांचा विकास करणे व अनुसूचित जातीच्या सांस्कृतिक व नितीमुल्यांवर आधारित विकास साधणाऱ्या प्रकल्पांसाठी स्वयंसेवी संस्थांना अनुदान मंजूर करण्याविषयीची निकष व नियमावली (लेखाशीर्ष २२२५ ३६३६) निश्चित करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत स्वयंसेवी संस्थांना अनुदान मंजूर करण्यात येते.

सदर योजनेंतर्गत सांस्कृतिक भवन, विपश्यना केंद्र, प्रशिक्षण केंद्र, वाचनालय, रिसर्च सेंटर, अभ्यासिका इत्यादींचे बांधकाम करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना अनुदान उपलब्ध करुन दिले जाते. प्रस्तावित प्रकल्पाच्या एकूण अंदाजपत्रकीय खर्चामध्ये शासनाचा हिस्सा ९० टक्के इतका व संबंधित संस्थेचा हिस्सा १० टक्के असणे बंधनकारक आहे.

श्री. नारायण काळबा गायकवाड रा.पेठवडज या व्यक्तीच्या एकूण तीन संस्थांना उपरोक्त योजनेंतर्गत अनुदान मंजूर करण्यात आले आहे. सदर संस्थेची नावे व संस्थेच्या प्रकल्पाकरीता मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाचा सविस्तर तपशील पुढीलप्रमाणे आहे-

१. जनकल्याण विकास मंडळ, पेठवडज ता. कंधार जि. नांदेड

विभागाच्या शासन निर्णय क्र. स्वंसअं-२०१८/ प्र. क्र. ०६/ बांधकामे, दि. २७ फेब्रुवारी, २०१८ अन्वये मौजे-खरब खंडगाव स्वरुप- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक बांधकामाकरीता रु. १.९८ कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

तद्नंतर उपरोक्त स्मारकाच्या बांधकामाकरीता विभागाच्या शासन निर्णय क्र. स्वंसअं-२०१९/ प्र. क्र. १८९/ बांधकामे, दि. २३ जून, २०२२ अन्वये रु.४.९९ कोटी इतका वाढीव निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार बांधकामास सुरुवात झाली असून शासन निर्णयातील नियम व अटीनुसार ३०% बांधकाम झाले नसल्याने बांधकाम ठेकेदारास अद्याप रक्कम अदा करण्यात आली नाही.

२. महाराष्ट्र सुराज्य मेमोरियल ट्रस्ट, होकर्णा तांडा, ता. मुखेड जि. नांदेड

विभागाच्या शासन निर्णय क्र. स्वसेअ-२०१८/ प्र. क्र. ३६३/ बांधकामे, दि.०८ मार्च, २०१९ अन्वये मौजे - होकर्णा तांडा, मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे महात्मा ज्योतिबा फुले स्मारक बांधकामाकरीता रु. ४.९९ कोटी एवढया रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

तद्नंतर उपरोक्त स्मारकाच्या बांधकामाकरीता शासन निर्णय क्र.बैठक-२०२४/ प्र. क्र. १८/ बांधकामे, दि. १६ मार्च २०२४, अन्वये रु. ९.९९ कोटी वाढीव निधी मंजूर करण्यात आला असून बांधकामास सुरुवात झाली आहे. परंतु शासन निर्णयातील नियम व अटीनुसार ३०% बांधकाम झाले नसल्याने बांधकाम ठेकेदारास अद्याप रक्कम अदा करण्यात आली नाही.

३. जय केदारनाथ सेवाभावी संस्था वाकद, ता. भोकर, जि. नांदेड.

शासन निर्णय स्वंसेअ-२०१९/ प्र. क्र. २११/ बांधकामे, दि. १६.९.२०१९ अन्वये मौजे-चिवळी ता.मुखेड जि.नांदेड येथे राजर्षी शाहु महाराज स्मारक बांधकामाकरीता रु.८.९२ कोटी एवढ्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून सद्यस्थितीत ७५% काम पुर्ण झाले आहे. तथापि,प्रकल्प किमतीच्या एकुण रक्कमेपैकी ७५ % रक्कम बांधकाम ठेकेदारास अदा करण्यात आली आहे.

श्री. नारायण काळबा गायकवाड, रा. पेठवडज या व्यक्तीची एक संस्था रद्द झाली होती, परंतु Joint Charity Commissioner, Aurangabad यांचे दि. ९.८.२०२१ रोजीच्या आदेशान्वये सदरहु संस्था पुनर्जिवित करण्यात आली आहे. तरी देखील सदरहु ३ तीन्ही संस्थेची धर्मादाय आयुक्त, या कार्यालयाकडून शहानिशा करण्यासाठी सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नांदेड या कार्यालयासोबत पत्रव्यवहार करण्यात आले आहे.

उपरोक्त तीन गावात महापुरुषांचे स्मारक बांधकामास विभागाच्या दि.०५.११.२०२० रोजीच्या शासन निर्णयातील नियम व अटीनुसारच मान्यता प्रदान करण्यात आली असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुल्यांकन दाखला प्राप्त करुनच तेवढयाच मूल्यांची रक्कम बांधकाम कंत्राटदारास अदा करण्यात आली आहे. तरी शासकीय अनुदानाचे अपहार करुन शासनाची फसवणुक केल्याचे निदर्शनास आले नाही. तसेच सदरहु तीन्ही संस्थेचे अध्यक्ष, पदाधिकारी व सदस्यांचे जात प्रमाणपत्र व जातवैद्यता प्रमाणपत्राची शहानिशा केली असता संस्थानिहाय सदस्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे-

I. जनकल्याण विकास मंडळ, पेठवडज ता. कंधार जि. नांदेड. या संसथेमध्ये एकुण ७ सदस्य असून सर्वजन मांग जातीचे (Schedule Caste) असल्याचे आढळून आले आहे.

II. महाराष्ट्र सुराज्य मेमोरियल ट्रस्ट, होकर्णा तांडा, ता. मुखेड जि. नांदेड, या संसथेमध्ये एकूण ९ सदस्य असुन सर्वजन मांग जातीचे (Schedule Caste) असल्याचे आढळुन आले आहे.

III. जय केदारनाथ सेवाभावी संस्था वाकद, ता. भोकर, जि. नांदेड सर्वजन या संसथेमध्ये एकुण ७ सदस्य असुन पैकी ५ सदस्य मांग जातीचे (Schedule Caste) व इतर २ सदस्य खुल्या प्रवर्गाचे असल्याचे आढळून आले आहे.

जनकल्याण विकास मंडळ या संस्थेस अल्पसंख्याक स्वंसेवी संस्थेची मान्यता प्राप्त आहे. तसेच अद्याप अनाधिकृत रक्कमेची उचल झाल्याचे निदर्शनास आले नाही. सदर प्रकरणी उपरोक्त संस्थेमार्फत समाज कल्याण आयुक्तालयास सादर केलेल्या कागदपत्रांची पुनश्चः शहानिशा करुन विशेष अहवाल समाज कल्याण आयुक्तालयामार्फत शासनास सादर करण्यात येणार आहे.

**********************